महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण

सचिव/ प्रा. यांचे कार्यालय

कक्ष क्र. ५२३, चौथा मजला, गृहनिर्माण भवन , कलानगर, वांद्रे पूर्व, मुंबई — ४०००५१

**बदली/नेमणूक/पदस्थापना**

**सहमुख्य अधिकारी (गट-अ)**

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**
**गृहनिर्माण भवन, वांद्रे [ पूर्व ], मुंबई -४०० ०५१**
**आदेश क्र.प्राधि/बदली/२०२६/ 984549 /प्र.७**
**दिनांक :- 30 SEP 2026**

**संदर्भ —** १) प्राधिकरण आदेश क्र. प्राधि./अति.कार्य./२०२६/९६०००४८/प्र.७, दि.१७.०८.२०२६
२) सह सचिव, गृहनिर्माण विभाग यांचे आदेश क्र.बदली-२०२६/प्र. क्र.१२३/गृनिभू,
दि.२९.०९.२०२६ रोजीचे आदेश

**आ दे श**

सह सचिव, गृहनिर्माण विभाग यांच्या दि.२९.०९.२०२६ रोजीच्या संदर्भ क्र. २ वरील आदेशान्वये महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण व त्याअंतर्गत विभागीय मंडळातील **सहमुख्य अधिकारी (गट-अ)** या संवर्गातील खालील नमूद अधिकाऱ्याची शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार त्यांच्या नावासमोर खालील तक्त्यातील स्तंभ (४) मध्ये दर्शविलेल्या पदावर बदलीने नेमणूक करण्यात येत आहे.

| अ. क्र. | अधिकाऱ्याचे नाव | सद्याची पदस्थापना/मंडळ | बदलीनंतर पदस्थापना | शेरा |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | श्री. विशाल देशमुख | मुख्य अधिकारी/ अमरावती मंडळ | सहमुख्य अधिकारी/ मुंबई मंडळ | रिक्त पदी |

२/- बदलीनंतर उक्त अधिकाऱ्यांना वेतनाबरोबर महागाई भत्ता व अन्य भत्ते अनुज्ञेय राहतील. सदर अधिकाऱ्यांस नियमानुसार पदग्रहण अवधी व बदली प्रवास भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

३/- संबंधित अधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या नवीन नियुक्तीच्या जागी रुजू व्हावे.

४/- संबंधित अधिकाऱ्यांनी कमीत कमी पदग्रहण अवधी घेऊन नव्या पदाचा तात्काळ पदभार स्विकारावा. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम २३ मधील तरतूदीनुसार पदस्थापनेत बदल करण्यासाठी कुठल्याही स्वरुपाचे आवेदन सादर केल्यास संबंधित अधिकारी शिस्तभंगाच्या कारवाईसाठी पात्र ठरतील.

५/- संबंधित नियंत्रक अधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, विहित कालावधीत संबंधित अधिकारी रुजू न झाल्यास, त्याबाबत प्राधिकरणास अवगत करावे. तसेच, त्यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई प्रस्तावित

करण्यात येईल. महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील नियम-३० (सी) नुसार त्यांचा रजा अर्ज स्वीकारण्यात अथवा मंजूर करण्यात येणार नाही.

६/- प्राधिकरणाच्या दि.१७.०८.२०२६ रोजीच्या संदर्भ क्र. १ वरील आदेशान्वये श्री. गोपीनाथ ठोंबरे, उपमुख्य अधिकारी/पणन/मुंबई मंडळ यांचेकडे सहमुख अधिकारी/मुंबई मंडळ या रिक्त पदाचा सोपविलेला अतिरिक्त कार्यभार या आदेशान्वये संपुष्ठात येत आहे.

७/- श्री. विशाल देशमुख, मुख्य अधिकारी/अमरावती मंडळ यांच्या बदलीने रिक्त झालेल्या मुख्य अधिकारी/अमरावती मंडळ या पदाचा अतिरिक्त कार्यभार या आदेशान्वये डॉ. विजय इंगोले, मुख्य अधिकारी/नागपूर मंडळ यांचेकडे पर्यायी व्यवस्था म्हणून पुढील आदेशापर्यंत तात्पुरत्या स्वरुपात सोपविण्यात येत आहे. डॉ. विजय इंगोले, मुख्य अधिकारी/नागपूर मंडळ यांनी स्वतःच्या मूळ पदाचा कार्यभार सांभाळून त्यांचेकडे सोपविलेला मुख्य अधिकारी/अमरावती मंडळ या रिक्त झालेल्या पदाचा अतिरिक्त कार्यभार पुढील आदेशापर्यंत पहावयाचा आहे.

सदरहू आदेश तात्काळ अंमलात येतील.

**मा.उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्रा.**
**यांचे मान्यतेने**

(प्रफुल्ल ठाकूर)
**सचिव/प्राधिकरण.**

**प्रति,**

**१. श्री. विशाल देशमुख,**
**(मुख्य अधिकारी/अमरावती मंडळ)**

**२. डॉ. विजय इंगोले,**
**(मुख्य अधिकारी/नागपूर मंडळ)**

**प्रत सस्नेह अग्रेषित :**

१) मा. मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्रा.
२) मा. मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ, मुं.इ.दु.व पु.मंडळ
३) मुख्य अभियंता -१, २, ३/प्रा.
४) वित्त नियंत्रक/प्रा.
५) विधी सल्लागार/प्रा.
६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा.
७) मुख्य अधिकारी /मुं.झो.सु.मंडळ , पुणे मंडळ, नाशिक मंडळ, छत्रपती संभाजीनगर मंडळ, नागपूर मंडळ, अमरावती मंडळ, कोंकण मंडळ,
८) मुख्य वास्तुशास्त्रज्ञ/प्रा.
९) चौकशी अधिकारी/प्रा.
१०) सक्षम प्राधिकारी -१,२ /प्रा.
११) मुख्य जनसंपर्क अधिकारी/प्रा.
१२) सहमुख्य अधिकारी, मुंबई मंडळ/मुं.इ.दु.व पु.मंडळ
१३) उपमुख्य अभियंता, पीएमएवाय/द व गु नि कक्ष/विशेष नियोजन प्राधिकरण/प्रा.-
१४) उपमुख्य अभियंता, पुर्व /पश्चिम /प्रनिस/बी.डी.डी /विशेष प्रकल्प कक्ष/मुंबई मंडळ
१५) उपमुख्य अभियंता, परिमंडळ - १,२,३,४/मुं.इ.दु.व पु.मंडळ /मुं.झो.सु.मंडळ